आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील ४१ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- अपदे-२०२५/प्र.क्र.२६१/पासु-२,**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
तारीख: १८ सप्टेंबर, २०२६.

**वाचा:-**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः- अपदे-२०२५/प्र.क्र.२६१/पासु-२, दि. १० मार्च, २०२६.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.३१.०८.२०२६
३) सहसंचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), मुंबई यांचे पत्र क्र.आसेआ/आस्था/कक्ष-५/टे-७/अस्थायी पदे/३६८/२६, दि.०५.०२.२०२६.

**प्रस्तावना:-**

आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील असलेल्या ४१ अस्थायी पदांना संदर्भाधीन अ.क्र. १ येथील शासन निर्णयान्वये दि. ०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात आल्याने सदरील ४१ अस्थाई पदांना पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

या शासन निर्णयासोबत जोडलेल्या “परिशिष्ट-अ” मध्ये नमूद करण्यात आलेल्या आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील ४१ अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२६ ते दि.२८.०२.२०२७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांचे वेतन खालील लेखाशीर्षामध्ये खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०२६-२७ या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा:-

| अ.क्र. | लेखाशिर्ष |
|---|---|
| १ | मागणी क्रमांक आर -१ मुख्य लेखाशिर्ष “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा, ०११-संचालन व प्रशासन, ००१ (१) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई (२२१० ००९३)” |
| २ | मागणी क्रमांक आर -१ मुख्य लेखाशिर्ष “२२१०-वैद्यकीय आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य , ००१-संचालन व प्रशासन, ००१ (२) प्रादेशिक कार्यालय (२२१० ०३५१)” |
| ३ | मागणी क्रमांक आर -१, मुख्य लेखाशिर्ष “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- |

| | |
|---|---|
| | सार्वजनिक आरोग्य, ००१-संचालन व प्रशासन, ००१ (१)- सहसंचालक आरोग्य सेवा, पुणे (२२१० ०३४२)” |
| ४ | मागणी क्रमांक आर -१ मुख्य लेखाशिर्ष “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, (०१)(०२)- प्रादेशिक कार्यालय (२२१० ०३५१)” |

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.३१.०८.२०२६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक, पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.३१.०८.२०२६ अन्वये दि.०१.०९.२०२६ ते दि.२८.०२.२०२७ पर्यंत अस्थाई पदांच्या मुदतवाढीस मान्यता देण्यात आली असली तरी, दरम्यानच्या काळात सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी तातडीने प्रस्ताव सादर करण्याबाबत वित्त विभागाने निर्देशित केले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार, अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२६ ते दि.२८.०२.२०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून त्यादरम्यान सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याकरीता सुधारीत आकृतीबंधाचे प्रस्ताव शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २९ जून,२०१७ नुसार तपासून व त्यानुसार कार्यवाही करुन तातडीने वित्त विभागास सादर करण्याकरीता आयुक्तालय कार्यालयाकडून उचित कार्यवाही करावी व त्याबाबातचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१८१५४५४९३७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA VITTHAL KUDALE

Digitally signed by RAJENDRA VITTHAL KUDALE
DN: cn=RAJENDRA VITTHAL KUDALE, o, ou, email=Rajendra.Kudale@nic.in, c=US
Date: 2026.09.18 16:16:33 +05'30'

**(राजेंद्र कुडले)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर.

२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा-१, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई
६. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई
७. अवर सचिव/कार्यासन अधिकारी, (सेवा-१/सेवा-२/अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (पासु-२)

"<u>परिशिष्ट-अ</u>"

(शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- अपदे-२०२५/प्र.क्र.२६१ /पासु-२,
दिनांक-१८ सप्टेंबर, २०२६ सोबतचे विवरणपत्र)

| अ. क्र. | आरोग्य संस्थेचे नाव | अस्थायी पदे (पदनाम व पदांची संख्या) |
|---|---|---|
| १ | आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई | १)लेखाधिकारी- १ |
| | | २)प्रशासकीय अधिकारी-१ |
| | | ३) अधीक्षक-३ |
| | | ४)सहायक अधिक्षक/वरिष्ठ सहायक-२ |
| | | ५)वरिष्ठ लिपीक/कनिष्ठ सहायक-७ |
| | | ६)कनिष्ठ लिपीक/लिपीक टंकलेखक-८ |
| | | ७)वाहनचालक-२ |
| | | ८)उदवाहनचालक-१ |
| | | ९) शिपाई-५ |
| | | १०)संशोधन अधिकारी-१ |
| | | ११)कनिष्ठ लिपीक-टंकलेखक-१ |
| | | १२)शिपाई-१ |
| | | १३)नियोजन अधिकारी-१ |
| | | १४) प्रशासकीय अधिकारी-१ |
| | | १५) सहाय्यक अधिक्षक-१, |
| | | १६) वरिष्ठ लिपिक-१, |
| | | १७) कनिष्ठ लिपिक-टंकलेखक-१ |
| | | १८)सांख्यिकी अन्वेषक-१, |
| | | १९) शिपाई-१, |
| | | २०) अधिक्षक-१ |
| **एकुण अस्थाई पदे** | | **४१** |